## नि.दि.दा.क्र.४०५/२०२३ मध्ये निशाणी २२ वरील आदेश

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांना दाव्यास कैफियत देण्यास झालेला विलंब माफीसाठी, झालेला विना कैफियतीचा आदेशा रद्द होवून अभिलेखावर कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ च्या कथनानुसार तो सतत आजारी होता, त्याच्या आईचे निधान झाले, जुनी व महसुल कडील कागदपत्रे वेळेत काढून देता आली नाहीत, यामुळे त्यांना वेळेत कैफियत दाखल करता आली नाही, करीता त्यांच्या विरुध्द विना कैफियत व म्हणणेचा आदेश पारीत झाला आहे. प्रतिवादी क्र.१ ची कैफियत अभिलेखावर असणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.१ हा प्रस्तूत अर्जासोबत कैफियत व म्हणणे तसेच प्रतिदावा दाखल करीत आहे. सबब अर्ज मंजूर करण्याची विंनती प्रतिवादी क्र.१ ने केली केली आहे.

२. वादी यांनी प्रस्तूत अर्जाखाली म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूर होण्यास विरोध दर्शविला आहे. वादीने अर्ज खोटा व लबाडीचा असल्याचा आक्षेप नोंदवून कॉस्टची मागणी केली आहे.

३. दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.१ व २ विरुध्द विना कैफियतीचा आदेश दिनांक २९.११.२०२३ पारीत झालेला आहे. प्रतिवादीना त्यांची कैफियत व म्हणणे दाखल करण्यास विलंब झाल्याचे दिसून येत आहे. दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यासाठी तसेच भविष्यात दाव्यात गुंतागुंत टाळण्यासाठी व दाव्याचे कामकाज दुतर्फा चालण्यासाठी, प्रतिवादींना संधी देणे न्यायोचित होणार आहे. त्यासाठी झालेला विना कैफियतीचा आदेशा रद्द होणे आवश्यक आहे. प्रस्तूत अर्ज मंजूर झाल्यास वादीचे नुकसान होणार नाही. कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबासाठी भरपाई म्हणून प्रतिवादी क्र.१ वर कॉस्ट लादणे उचीत होणार आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-:: आदेश ::-**

१. अर्ज रुपये ५००/- कॉस्ट वादी यांना पुढील तारखेस देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. कॉस्टीची रक्कम दिल्यानंतर दिनांक २९.११.२०२३ रोजी निशाणी क्र.१ वर झालेला विना कैफियतीचा आदेश **प्रतिवादीं क्र.१ करीता** रद्द करण्यात येत आहे.

३. उपरोक्त कॉस्ट दिल्यानंतर कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो तसेच प्रतिवादी क्र.१ यांना कैफियत अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

दिनांक ११.०३.२०२४. (एम.आर.कामत)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment / Order.

| | | |
|---|---|---|
| Court | : | Jt. C. J. J. D. Pandharpur. |
| Name of Stenographer | : | R.M.Gogi. |
| Date | : | 11/03/2024. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 11/03/2024. |